# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

page 10
22 Sep 2025

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज

https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# बा.दे. कॉलेजमध्ये बीएससी भाग २ साठी सुधारित अभ्यासक्रमावर कार्यशाळा संपन्न

महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

पाटण, दि. २१ सप्टेंबर : कोयना एज्युकेशन सोसायटीचे बी.डी. कॉलेज, पाटणमध्ये सुधारित अभ्यासक्रमावरील कार्यशाळा संपन्न झाली. यामध्ये प्राणीशास्त्र विभागाची बी.एस.स्सी भाग दोन व संख्याशास्त्र विभागाची बी.एस.स्सी भाग दोन या वर्गांसाठी एन.ई.पी. २.० साठी सदर कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे सिनेट सदस्य डॉ.आर. आर. कुंभार होते. तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. पवार होते. विषयतज्ञ डॉ.एस. बी महाडिक, डॉ. एस.बी. केंगार,डॉ. एस.एस. पाटील यांची उपस्थिती होती. प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. एस.आर सुपनेकर, प्रा. डी.डी. थोरात,डॉ. सी. एच.व्ही काटे यांची उपस्थिती होती. कार्यशाळेच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर संख्याशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. आर सुपनेकर यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रमुख पाहुणे व उद्घाटक डॉ. आर. आर. कुंभार यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले कि, नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अध्ययन व अध्यापनामध्ये बदल झाले आहेत. पदवी शिक्षणात आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक झाले आहे.. विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे आहे. नवीन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात सखोल भर पडू शकते. पारंपारिक शिक्षण पद्धतीपेक्षा नवीन शैक्षणिक धोरणातील अभ्यासक्रम हे व्यापक आहेत.त्यामुळे विद्यार्थी अधिक सक्षम होण्यास मदत होईल. अभ्यासक्रमात आपण जे शिकतो त्याचा उपयोग आपल्याला आयुष्यात करता आला पाहिजे असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. एस.डी. पवार म्हणाले की, अशा अभ्यासक्रम कार्यशाळेमधून प्राध्यापकांना त्यांच्या कौशल्यांमध्ये सुधारणा करण्यास आणि त्यांच्या अध्यापन पद्धतीच्या विशिष्ट क्षेत्रांमध्ये त्यांचे ज्ञान वाढविण्यास सक्षम करतात. या कार्यशाळांमधून मिळालेले कौशल्य अध्यापनाची गुणवत्ता लक्षणीयरीत्या वाढवू शकते आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये त्याचा फायदा होतो. नवीन शैक्षणिक धोरणात जे बदल झाले आहेत ते स्वीकारावे लागतील. प्रत्येक विषयाचे वेगळे महत्व आहे त्याचा अभ्यास सर्वांगाने होणे आवश्यक आहे. नवीन अभ्यासक्रमाबद्दल ज्या शंका असतील त्यावर चर्चा करून त्याचे निराकरण सदर कार्यशाळेमध्ये करण्याचा प्रयत्न राहील. कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये प्राणीशास्त्र विभागाकडून प्रा.शुभांगी पोळ, प्रा.ए.बी. घाडगे यांनी मार्गदर्शन केले तर संख्याशास्त्र विभागाकडून डॉ.के.जी.पोतदार, डॉ.एस.डी.पवार, डॉ. पी.वाय.पाटील, डॉ. पी.आर. एच. वळीव यांनी विषयतज्ञ म्हणून मार्गदर्शन केले.



कार्यशाळेचे आभार प्रदर्शन प्रा. डी. डी. थोरात यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केले. तर सूत्रसंचालन डॉ. मंजुषा शिंदे व डॉ. एस.एस. कुंभार यांनी केले. सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ. एल.एस.भिंगारदेवे, प्रा.प्रदीप गायकवाड यांचे सहकार्य लाभले. कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयातील जवळपास ९५ प्राध्यापक उपस्थित होते.